# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २८५/२०२४ दिनांक- ०६/०८/२०२४.

## "भाईदर पोलीस ठाणे यांनी गुटखा वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक करुन ५९,८४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल केला जप्त"

भाईंदर पोलीस ठाणे हद्दीतील बॉम्बे मार्केट, भाईंदर पश्चिम येथुन दिनांक ०५/०८/२०२४ रोजी १३:३० वा. चे सुमारास महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखुजन्य अन्नपदार्थाची (गुटखा) वाहतुक होणार असलेबाबत बिटमार्शल-१ कर्तव्य करीता असलेले पोलीस अंमलदार/१८०१५ विशाल भोई यांना गोपनिय बातमी मिळाल्याने त्यांनी दिवसपाळी ठाणे अंमलदार करीता असलेले सहा. पोलीस निरीक्षक श्री आंनदराव काळे यांचे मार्फतीने वपोनि/श्री विवेक सोनवणे यांना कळवल्याने वपोनि यांनी कारवाई करण्याचे आदेशीत केल्याने पंच व पथक यांनी रवाना होवुन बॉम्बे मार्केट येथे सापळा लावुन आरोपी विशालकुमार सोमईप्रसाद गौतम, व्यवसाय-मजुरी, रा.भोलानगर, भाईंदर प. यास ताब्यात घेवून त्याचे ताब्यातुन एकुण ५९,८४०/- रुपये किंमतीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखुजन्य अन्नपदार्थ जप्त करुन त्याचे विरोधात भाईंदर पोलीस ठाणे गु.रजि.नं. I २६३/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम १२३,२२३,२७४,२७४ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम कलम २३,२६(२),२६(२)(४),३०(२)(अ),२७ प्रमाणे गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०१ मिरारोड,  श्रीमती दिपाली खन्ना, सहाय्यक पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, श्री विवेक सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भाईंदर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री आनंद काळे/सहाय्यक पोलीस निरीक्षक, पो.अं./विशाल भोई, , संकेत गोवारी यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
BHAYANDAR ARTS
Ph.: 022/8192257
Mob.: 8657936951

--------oooo--------